पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142
**Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

---

# वार्तापत्र

दिनांक ०६/११/२०१९

## गडचिरोली जिल्हयातील दाखल ७ गुन्हयातीलजप्त ७,९९,१२२/रुपयाचा गांजा (अंमली पदार्थ) नष्ट

आज दिनांक ०५/११/२०१९ रोजी गडचिरोली जिल्हयातील पोलीस स्टेशन सिरोंचा, आरमोरी, देसाईगंज व चामोर्शी येथील न्यायनिवाडा झालेल्या एकुण ०७ गुन्हयातील जप्त ९८ किलो ८९५ ग्रॅम वजनाचा व ७,९९,१२२/- रुपये किंमतीचा गांजा (अंमली पदार्थ) चा कायदेशीर प्रक्रियेव्दारे नाश करण्यात आला.

शासनाचे परवानगीने पोलीस अधिक्षक श्री. शैलेश बलकवडे यांचे अध्यक्षतेखाली, पोलीस उपअधिक्षक (गृह) श्री. गोरख गायकवाड, पोलीस निरीक्षक श्री. उल्हास भुसारी स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली यांची गांजा नाश करणे करीता समीती गठीत करण्यात आलेली होती. या समितीमार्फत न्यायालयाकडुन निकाली निघालेल्या एकुण ०७ गुन्हयांतील जप्त असलेला ९८ किलो ८९५ ग्रॅम वजनाचा व ७,९९,१२२/- रुपये किंमतीचा गांजा (अंमली पदार्थ) पोलीस मुख्यालय गडचिरोली येथील पटांगणात खड्डा खोदुन लाकडे व ज्वलनशिल पदार्थाच्या मदतीने पर्यावरणास कुठलीही हानी होणार नाही याची दक्षता घेवुन मा. न्यायदंडाधिकारी श्री. एन.पी. वासाडे, प्रथम श्रेणी गडचिरोली यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत नाश केलेला आहे. सदर संपुर्ण प्रक्रियेचे पोलीस फोटोग्राफर पोहवा/रविचंद्र बारसागडे व नापोशि/पंकज भगत यांनी छायाचित्रण केले.

सदर प्रक्रियेदरम्याण न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा नागपुर येथील श्री. मधुसुदन पोशेट्टीवार, जिल्हा परीषद गडचिरोली येथील श्री. नामदेव वाळके, अब्दुल अन्सार शेख व वजन मापे विभाग गडचिरोली येथील रुपचंद फुलझेले उपस्थित होते.

सदर प्रक्रियेकरीता स्थानिक गुन्हे शाखा, गडचिरोली येथील महीला पोलीस उपनिरीक्षक पुनम जगताप, सफौ/ किशोर ईंगोले, पोहवा/ भाउराव बोरकर,पोहवा/ कान्हु गुरनुले, पोहवा/ नरेश सहारे, पोशि/ नुतेश धुर्वे, पोशि/संदिप पराते यांनी विशेष परीश्रम घेतले.

